■ बीड (महाराष्ट्र) ■ सायं.दैनिक ■ मराठी ■ वर्ष – ०२ ■ अंक – २८१ ■ रविवार दि.२९ जून २०२५ ■ आरएनआय – एमएएचएमआर/२०२३/८३९६५ ■ किंमत ३ रू. । पाने ४

■ Beed (Maharashtra) ■ Daily Evening ■ Marathi ■ Year - 02 ■ Issue - 281 ■ Sunday Dt.29 June 2025 ■ RNI : MAHMAR/2023/83965 ■ Price - 3 Rupees ■ Pages 4

# खाजगी क्लासेसमध्ये अल्पवयीन विद्यार्थिनीवर अत्याचार करणारे दोन्ही शिक्षकांना ठोकल्या बेड्या, नागरिकांनी सोमवारी दिला होता मोर्चाचा इशारा!

## उमाकिरण नावाला ग्रहण लावणाऱ्या दोन्ही शिक्षकांना फाशीची शिक्षा देण्याची मागणी

अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ
सायं.दैनिक महाराष्ट्र
# आरंभ
संपादक : दिपक थोरात Mob.9860898564

## नागरिकांनी जिल्ह्यात शांतता ठेवावी कुणीही कायदा हातात घेऊ नये : पोलीस अधीक्षक कॉवत

# बीड जिल्हा बंद च्या इशाऱ्याने जिल्हा पोलीस दलात सुत्रे हलली; दोन दिवस आरोपी कुठे होते?

## बीडच्या दिग्गज नेत्यांचे पाठबळ, असल्याने पळून लावण्यास विद्यमान आमदारांचा समावेश?

## आरोपी विजय पवार, प्रशांत खाटोकर दोन दिवस पोलिसाला का सापडले नाही?

## विजय पवार सारख्याचा खरोखरच माज उतरवयाचा असेल तर सर्वांनी पुढे येण्याची गरज?

बीड । प्रतिनिधी

शिक्षण क्षेत्राला काळिमा फासत अकरावीच्या वर्गातील विद्यार्थिनीचा केबिनमध्ये नेत लैंगिक छळ करणाऱ्या विजय पवार आणि प्रशांत खाटोकर या दोन्ही शिक्षकांना बीडच्या स्थानिक गुन्हे शाखेने जेरबंद केले आहे. शनिवारी मध्यरात्री बारा वाजता ही कारवाई बीड तालुक्यातील मांजरसुभा परिसरात केली. या शिक्षकांच्या मागणीसाठी सोमवारी नागरिकांनी मोर्चाचा इशारा दिला होता.

बीड शहरातील नामांकित उमाकरण शैक्षणिक संकुल येथे १७ वर्षाची मुलगी शिक्षण घेत होती. दि.३० जुलै २०२४ ते २५ मे २०२५ यादरम्यान विजय पवार व प्रशांत खाटोकर यांनी विद्यार्थ्यीनीला आपल्या केबिनमध्ये बोलावून घेत तिचा लैंगिक छळ केला होता. तिला नग्न करत आपल्या मोबाईल मध्ये फोटोही काढल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला होता.

प्रशांत खाटोकर जे फिजिक्स शिकवतात ते मला क्लास संपल्यानतर तेथील केबिनमध्ये एकटीला बोलवून ते माझी कीस घ्यायचे, माझ्या छातीला व गुप्त अंगाला बॅड टच करायचे. अंगावरील कपडे काढायला लावून माझे ते फोटो काढायचे.

### राजकीय पाठीराख्यांनी पवारला सरेंडर करायला लावलं?

विजय पवार आणि त्याच्या साथीदारावर पोक्सो अंतर्गत गुन्हा दाखल झालेला आहे. घटना अतिशय निंदणीय आणि नीच असल्याने जनक्षोभदेखील मोठ्या प्रमाणावर वाढत आहे. त्यामुळे विजय पवारचे जे कोणी राजकीय पाठीराखे असतील त्यांनी आता त्याला सरेंडर करायला लावल. त्याच्यासमोर सरेंडर होण्याशिवाय पर्यायच नाही. जसं वाल्मिक कराडच्या बाबतीत घडलं तसचं आता विजय पवारलाही सरेंडर करायला लावलं असल्याची चर्चा सुरू झाली आहे.

### पैसा आणि राजकीय वजन वापरुन प्रकरणे दाबली

विजय पवार याने कोचिंगच्या माध्यमातून करोडो रुपये कमविले. त्यानंतर सामाजिक कार्यात तो स्वत:ला मिरवू लागला. राजकीय पक्षाशी जवळीक केली. नेत्यांच्या बैठकीत उठबैस करु लागला आणि यामुळे पैसा आणि सत्ता याच्या जोरावर माझे कोणी काही बिघडू शकत नाही अशा अविर्भावात अनेक लोकांना विजय पवारने अंगावर घेतले. आता सर्व काही बाहेर निघू लागलं आहे.

कधी कधी ते क्लास संपल्यानंतर क्लासरुम मध्ये कोणी नसताना तिथे सुध्दा ते मला किस करायचे व छातीला व इतर अंगाला बॅड टच करायचे. ते असे माझ्यासोबत वारंवार करत असायचे. मला धमकी द्यायचे की, तू जर घरी कोणाला सांगितले तर मी तुला मारुन टाकेन, अशी धमकी प्रशांत खाटोकर यांनी आपल्याला दिल्याचे पीडित मुलीने पोलिसांना दिलेल्या तक्रारीत म्हटले आहे.

याप्रकरणी २६ जून रोजी रात्री शिवाजीनगर पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल झाला. त्यानंतर हे दोन्ही आरोपी फरार झाले होते. त्यांच्या शोधासाठी स्थानिक गुन्हे शाखेसह तीन पथक रवाना झाली होती. अखेर या दोन्ही शिक्षकांना बेड्या ठोकण्यात पोलिसांना यश आले आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत, अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक शिवाजी बांटेवाड व त्यांच्या पथकाने केली.

विजय पवार याला राजकीय पाठबळ असल्याचा आरोप पालकांनी केला आहे. तर आरोपी शिक्षक विजय पवार हा विद्यमान राष्ट्रवादी शरद पवार गटाचे आमदार संदीप क्षीरसागर यांचा कार्यकर्ता असून त्याचे अनेक फोटो सोशल माध्यमावर व्हायरल होत आहे.







### आणखी काही विद्यार्थिनींवर अत्याचार झाल्याचा संशय?

या प्रकरणात एका विद्यार्थिनीने तक्रार दिल्यावरुन दोघा आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. परंतु गेल्या अनेक दिवसांपासून हे प्रकार चालू आहेत. एक विद्यार्थिनी समोर आली असली तरी आणखी बऱ्याचशा विद्यार्थिनीवर अशा प्रकारचे अत्याचार झाले, परंतु इज्जतीच्या भीतीपोटी त्यांनी याची चर्चा केली नाही. पोलीस याचा संपूर्ण तपास करत आहेत. ज्या वर्गात ही विद्यार्थिनी शिकत होती त्या बॅचमधील अन्य विद्यार्थिनीशी संपर्क साधुनही त्यांचे जबाबही घेतले जात आहेत.

# गुटख्याचे पोते घेऊन जाणारी कार पकडली

### चकलांबा पोलिसांची कारवाई

चकलांबा । प्रतिनिधी

पोलीस अधिक्षक नवनीत कॉवत यांनी अवैध धंद्यावर कठोर कारवाईचे आदेश दिले असून चकलांबा पोलिसांनी मागच्या काही दिवसांपासून कारवाईची मोहीम जोरदार राबविण्यास सुरुवात केली आहे. जुगार अड्डे, वाळूचे टॅक्टर, हायवा ताब्यात घेण्याची कारवाई केल्यानंतर आता एका कारमधून गुटख्याचे पोते पोलिसांनी सापळा रचून ताब्यात घेतले. यात ४ लाख ८३ हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

चकलांबा पोलीस ठाण्याचे सपोनि संदीप पाटील यांना गुप्त माहिती मिळाली होती की एका कारमधून गुटख्याची वाहतूक होणार आहे. त्यानुसार नगर – बीड यांच्या सीमेवर असणाऱ्या गोगस पारगाव येथे सापळा रचून अंधारात वाट बघत बसलो संशयित वाहन येताच तात्काळ रस्त्यावर बॅरिगेट्स आडवे लावून सदरचे वाहन अडविले व त्याची तपासणी केली असता कार क्रं. चक१२ टथ २१६२ मध्ये महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधित केलेला गुटख्याचे चार मोठे पोते



आढळून आले आहेत. याप्रकरणी गाडी चालक शिवाजी मारोती बटूळे वय ४३ रा. भरजवाडी ता. पाथर्डी, जिल्हा अहिल्यानगर यांचे विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून या कारवाईत ४ लाख ८३ हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. ही कारवाई पोलीस अधिक्षक नवनीत कॉवत, अप्पर पोलीस अधिक्षक सचिन पांडकर, पोलीस उपअधीक्षक श्री.राजगुरू यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि संदीप पाटील, किरण मिसाळ, प्रशांत घोंगडे, खटाणे, अर्जुन थापडे आदींनी केली आहे.

### तहसील कार्यालयाने अनेक वेळा पाठपुरावा केला : तहसीलदार संदीप खोमणे

# पंचायत समितीच्या कारभारामुळे घरकुलधारकांना वाळू मिळत नाही

गेवराई । प्रतिनिधी

महाराष्ट्र शासनाच्या वतीने घरकुलधारकांना मोफत वाळू मिळणार, अशी नवीन नवीन योजना काढण्यात आली आहे. या योजनेची अंमलबजावणी होण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या वतीने पंचायत समितीच्या विभागांना सूचना देण्यात आल्या आहेत. परंतु पंचायत समितीच्या विभागाकडून वेळेत माहिती देण्यात आली नाही. अशी माहिती गेवराई चे तहसीलदार संदीप खोमणे यांनी दिली आहे.

या योजनेमध्ये घरकुलधारकांना वाळू मिळण्यासाठी तालुक्यातील मंजूर घरकुलधारकाचे नाव विहित नमुन्यामध्ये महसूल विभाग यांना दिल्यानंतर संबंधित महसूल विभागाच्या वतीने ती यादी गौण खनिज यांच्या संकेतस्थळावर अपलोड करण्यात येते. त्यानंतर संबंधित घरकुलधारकाच्या नावे ईटीपी पावती तयार होऊन वाळू देण्यात येते.



जिल्हाधिकारी यांच्या आदेशाने वाळू कोठून उपलब्ध करून द्यावी याच्या आदेश येतात त्यानुसार तहसीलदार काम करतात. गेवराई तालुक्यातील घरकुलधारकांना या नियमानुसार काम झाले असते. आठ दिवसांमध्ये वाळू मिळाले असते परंतु महसूल प्रशासनाने वारंवार पंचायत समिती यांना मंजूर घरकुल धारकांची यादी विशिष्ट नमुन्यामध्ये पाठवण्यासाठी पत्रव्यवहार केला परंतु पंचायत समिती विभागाकडून कुठलाही पाठपुरावा होत नव्हता यासाठी स्मरण पत्र ही गटविकास अधिकारी यांना देण्यात आले तरीदेखील यादी उपलब्ध झाली नाही. घरकुल मंजूर झालेली यादी ९ जून च्या अगोदर गौण खनिज या संकेतस्थळावर महसूल विभागाच्या वतीने अपलोड करण्याची संधी होती. गौण खनिज अधिनियमानुसार जून जुलै ऑगस्ट सप्टेंबर या महिन्यांमध्ये नदीपात्रामधून उत्खनन करण्यास मनाई असते. त्यामुळे ९ जून हे अंतिम तारीख घरकुलधारकांच्या वाळूसाठी देण्यात आली होती. पंचायत समिती विभागाने मंजूर भरपूर धारकाचे याद्या न दिल्याने महसूल विभागाला या याद्या या संकेतस्थळावर दाखल करता आल्या नाही. त्यासाठी तहसील कार्यालय जबाबदार नाही.

गेवराई तालूक्यात्तील घरकूल बांधकामासाठी वाळू मिळणे बाबतचे लाभार्थी यांची यादी देण्यात येणारे विवरणपत्रात एक्सेलशीट मध्ये गावनिहाय, पीडीएफ करून माहीती तात्काळ सादर करणे बाबत वारंवार पंचायत समिती विभागाला पत्राद्वारे कळविण्यात आले आहे. याबाबतचे स्मरण पत्र ही देण्यात आले असून पंचायत समिती विभागाने घरकुल लाभार्थ्यांची यादी न दिल्याने घरकुलधारक वाळू मिळण्यापासून वंचित राहिले आहे.